**नियमीत दिवाणी मुकदमा नं. ५४/२०१७ मधील निशाण २१ वरील आदेश**

CNR No.: MHSI05-000289-2017

प्रस्तुतचा अर्ज हा वादीतर्फे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी दाखल करण्यात आलेला आहे. वादीने असे नमूद केले आहे की या दाव्याचे कामी वादीने नवीन दुकान गाळयाचे संदर्भात ताबा मिळण्यासाठी, मासिक भाडे मिळण्यासाठी व नुकसान भरपाई मिळण्यासाठी दावा दाखल करण्यात आलेला आहे. मात्र त्या नवीन दुकान गाळयास आता घर क्रमांक पडलेला आहे. त्यामुळे त्या अनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यकता आहे. सदरची दुरुस्ती तांत्रिक स्वरुपाची असल्यामुळे ती मजूर करावी अशी मागणी वादीने केलेली आहे. यावरती प्रतिवादी याने आपले म्हणणे सादर करुन अर्ज खोटा व खोडसाळ असल्यामुळे व दुरुस्ती मुळे दाव्याचे मुळ स्वरुपात बदल झाल्याने दुरुस्ती नामंजुर करावी अशी मागणी केलेली आहे.

२. उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्ताविक केलेली दुरुस्ती पाहता सदर दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची दिसून येते. त्या दुरुस्तीमधून दावा मिळकतीचे वर्णन स्पष्ट होणारे आहे. सबब अशा तांत्रिक दुरुस्तीस मंजुरी दिल्याने प्रतिवादी याला कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

अर्ज मंजुर करण्यात येतो.

सही/—

दि. १९/०९/२०१९.

(विनायक द. पाटील )
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.

Dictated on : 19/9/2019
Transcribed on : 19/9/2019
checked on : 20/9/2019